**<u>प्रेसनोट</u> (<u>प्रजासत्ताक दिन</u>)** दि.२६/०१/२०१८

दि.२६ जानेवारी २०१८ रोजी प्रजासत्ताक वर्धापनदिनाचा मुख्य शासकीय ध्वजारोहन सोहळा मा.ना.श्री. गिरीश बापट,अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण,अन्न आणि औषध प्रशासन,संसदीय कार्यमंत्री तथा पालकमंत्री पुणे जिल्हा यांचे शुभहस्ते शिवाजीनगर,पोलीस मुख्यालय, पुणे शहर येथे सकाळी ०९/१५ वा. संपन्न होवुन प्रमुख पाहुणे यांनी मानवंदना स्वीकारली. परेड संचलन झाल्यानंतर २६ जानेवारी २०१८ प्रजासत्ताक दिनाचे निमीत्ताने पोलीस आयुक्तालयातील पोलीस अधिकरी व पोलीस कर्मचारी यांना त्यांचे सेवाकालावधीतील प्रशंसनीय सेवेसाठी राष्ट्रपतीचे पोलीस पदक मिळाल्याबद्दल प्रमुख पाहुणे यांनी विशेष प्राविण्य मिळविलेल्या पोलीस अधिकरी व कर्मचारी यांना पुषगुच्छ देवुन त्यांचा विशेष सत्कार करुन गौरविण्यात आले आहे.

तसेच जिल्हा क्रिडा पुरस्कार व गुणवंत क्रिडा शिक्षक पुरस्कार सन २०१६-२०१७ साठी जिल्हयातील उत्कृष्ट क्रिडापटु, गुणवंत क्रिडा मार्गदर्शक, गुणवंत क्रिडा संघटक / कार्यकर्ता यांचे कार्य योगदानाचा गौरव व्हावा व त्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने राज्य शासना तर्फे जिल्हा क्रिडा पुरस्कर देण्यात आला. त्यावेळी श्री.सौरभ राव,जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, पुणे,श्री.चंद्रकांत दळवी,विभागीय आयुक्त,पुणे विभाग,पुणे, तसेच मा.रविंद्र कदम,सह पोलीस आयुक्त पुणे शहर हे उपस्थित होते.

प्रजासत्ताक दिनाचे परेड कवायतीसाठी एकुण १७ प्लाटुनची रचना करण्यात आली होती. त्यामध्ये पुणे शहर पोलीस आयुक्तालय,पुणे शहर, पुणे शहर वाहतुक पोलीस, राज्य राखीव पोलीस दल, पुणे लोहमार्ग, पुणे ग्रामीण, गृह संरक्षक दल, नागरी संरक्षण दल, आर्मी,नेव्हल विंग,एअर फोर्स,(एन.सी.सी.), कारागृह रक्षक दल व पुणे पोलीस पब्लीक स्कुल शालेय विद्यार्थी व विद्यार्थीनी यांचा समावेश होता. तसेच पुणे शहर व पुणे ग्रामीण यांचेकडील वाद्य-वृंदयांनी भाग घेतला होता. त्यानंतर पुण्यातील विविध चार शाळेतील मुला-मुलींनी सांस्कृतिक कार्यक्रमाचे दर्शन घडविले. सदर कवायतीचे नेतृत्व जयश्री तानाजी गायकवाड,सहा.पोलीस आयुक्त,लष्कर,विभाग,पुणे शहर यांनी केले. सेकंड कमांडर डॉ.शिवाजी पंडीतराव पवार,सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग,पुणे यांनी केले.

परेड संचलनामध्ये मोटार सायकल रायडर, रूद्र श्वान पथक, १०० नंबर वाहन, वज्र वाहन, जलद प्रतिसाद पथक, वरूण वॉटर कॅनॉन, मोबाईल कंट्रोल वाहन, दोन शासकीय रूग्णवाहिका, दोन अग्निशामक वाहन, सामाजिक वनीकण, समता रथ(बार्टी), बीव्हिजी. इंडीया, कृषी विभाग,जिल्हा परिषद, पुणे मनपा असे एकुण सहा चित्ररथ सामील होते.

या कार्यक्रमासाठी, मा.रविंद्र सेनगांवकर,अपर पोलीस आयुक्त,दक्षिण व उत्तर विभाग,पुणे शहर, मा.प्रदिप देशपांडे,अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे शहर, मा.साहेबराव पाटील,अपर पोलीस आयुक्त,(प्रशासन),पुणे शहर, मा. सुवेझ हक,पोलीस अधिक्षक,पुणे ग्रामीण,पुणे व इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी व पोलीस कमर्चारी हजर होते. तसेच पुणे शहरातील विविध प्रशासकीय अधिकारी, लोकप्रतिनीधी व प्रतिष्ठीत नागरीक उपस्थित होते.

**टिपः- परेड संचलनाचे फोटो crimepress.pune@gov.in या ई-मेल आयडी व https://punepolice.co.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

जनसंपर्क अधिकारी,<br>
पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर








पुणे शहर पोलीस मुख्यालय
शिवाजीनगर, पुणे